# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अर्थशास्त्रातील योगदान

**प्रा. शत्रुघ्न शिवाजी पाटील** (एम.ए., सेट, अर्थशास्त्र, एम.एल.आय.एस., नेट, सेट, ग्रंथालयशास्त्र) ग्रंथपाल, क्रांतिसिंह नाना पाटील कॉलेज, वाळवा ई.मेल.आयडी. shatrughna.edu@gmail.com मो.नं.९८२२८७७४३७

---

**गोषवारा**

डॉ. भीमराव रामजी आंबेडकर (१८९१-१९५६) यांनी समाजातील असमानता, भेदभाव आणि श्रमिक हक्क या विषयी विचार करीत असंख्य सुधारणा सुचवल्या. आंबेडकरांच्या शिक्षणाचा प्रवास अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठ आणि लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सपर्यंत विस्तारित होता. या शिक्षणामुळे त्यांनी भारतीय अर्थव्यवस्थेची सखोल समज मिळवली आणि त्यावर मौलिक विचार मांडले. त्यांच्या कार्याची महत्वाची बाब म्हणजे जातिव्यवस्थेच्या आर्थिक परिणामांवर त्यांनी केलेला अभ्यास. आंबेडकरांच्या मते, जातीव्यवस्था ही एक अशी रचना आहे जी आर्थिक विकासाला बाधा आणते. त्यांनी याबद्दल स्पष्टपणे सांगितले की, जातींच्या आधारावर झालेली विभाजन यामुळे औद्योगिक विकासावर विपरीत परिणाम होतो. त्यामुळे त्यांचे विचार अद्वितीय आणि प्रभावी ठरले. आंबेडकरांचे आर्थिक विचार "बहुजन हिताय, बहुजन सुखाय" या मंत्रात स्पष्टपणे व्यक्त झाले आहेत. त्यांची प्राथमिकता म्हणजे गरीब आणि वंचित वर्गांना अर्थशास्त्रीय दृष्टिकोनातून समाविष्ट करणे. त्यांनी आर्थिक धोरणे सर्वसमावेशक असायला हवीत. आंबेडकरांनी "दि प्रॉब्लेम ऑफ रुपी" या त्यांच्या प्रसिद्ध ग्रंथात चलनव्यवस्थेच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकला. त्यात त्यांनी भारतातील चलनाचा इतिहास, त्याची व्याप्ती आणि आर्थिक स्थिरतेची आवश्यकता याबद्दल सुसंगत व तपशीलवार विश्लेषण केले. त्यांनी सांगितले की, आर्थिक विकासासाठी स्थिर चलन व्यवस्था अत्यावश्यक आहे. आजच्या काळात, डॉ. आंबेडकरांचे विचार अधिक महत्वाचे ठरले आहेत. आर्थिक असमानता, सामाजिक भेदभाव आणि श्रमिक हक्क याबाबतच्या त्यांच्या विचारांचा अभ्यास करून, आपण अधिक समतोल आणि न्यायसंगत समाजाची निर्मिती करू शकतो. त्यांच्या कार्यामुळे आजही अनेक सामाजिक चळवळींना प्रेरणा मिळत आहे, आणि त्यांच्या विचारांची प्रासंगिकता टिकून आहे. अर्थशास्त्र, समाजशास्त्र, आणि कायदा यांचा समावेश असलेल्या आंबेडकरांच्या विचारधारेतून आजच्या पिढीला एक प्रेरणादायक दिशा मिळते. त्यांच्या विचारांचा अभ्यास करणे म्हणजे सामाजिक न्याय आणि समानतेच्या दिशेने एक ठोस पाऊल उचलणे होय. डॉ. आंबेडकरांचे विचार आजच्या काळात देखील ताजे आहेत आणि त्यांच्या कार्याचा प्रभाव भारतीय समाजात आजही अनुभवता येतो.

**किवर्ड:** अर्थशास्त्र, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. आंबेडकरांचे विचार, आर्थिक विकास, आर्थिक सुधारणा.

**प्रस्तावना:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय समाजातील एक अत्यंत महत्वाचे विचारवंत, कायदा निर्माते आणि अर्थशास्त्री आहेत. त्यांनी भारतीय समाजाच्या आर्थिक, सामाजिक व राजकीय संरचनेत सुधारणा करण्यासाठी अनन्यसाधारण योगदान दिले. त्यांनी केवळ समाजसुधारणा नाही, तर अर्थशास्त्रातील अनेक विचार आणि लेखनांद्वारे समाजातील आर्थिक असमानता भेदभाव आणि श्रमिक हक्क यावर लक्ष केंद्रित केले. या विचारांच्या माध्यमातून, त्यांनी भारतीय समाजाला एक नवी दिशा दिली. त्यांच्या विचारांचा अभ्यास केल्यास, आपल्याला समजते की त्यांनी अर्थशास्त्रातील मुद्द्यांवर कशाप्रकारे प्रभाव टाकला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अर्थशास्त्राचे विद्यार्थी, प्राध्यापक आणि अभ्यासकही होते. अमेरिकेच्या कोलंबिया विद्यापीठाने अर्थशास्त्र या विषयात १९१५ साली एम. ए. व १९१७ साली पीएच. डी. या पदव्या प्रदान केल्या. त्यानंतर १९२१ साली 'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स' मधून डॉ. आंबेडकरांनी 'डॉक्टर ऑफ सायन्स' ही अत्युच्च पदवी मिळवली. अर्थशास्त्राचे शिक्षण घेत असताना त्यांनी अर्थशास्त्रावर मौलिक ग्रंथ लिहिले. (जाधव, ३६१)

'भारताच्या व जगाच्या राजकीय अर्थव्यवस्थेचे अध्ययन व संशोधन करून निर्भीड व तर्कशुद्ध मांडणी केली. शोषित समाजाच्या कल्याणासाठी व देशासाठी कोणती आर्थिक आणि राजकीय धोरणे घातक ठरलेली आहेत, कोणते धोरण, आर्थिक संरचना स्विकारली पाहिजे याचे अभ्यासपूर्ण विश्लेषण त्यांच्या विविध ग्रंथात, भाषणात, लेखात केलेला आहे.' भारतातील जातिव्यवस्थेच्या अर्थशास्त्राचा विचार व मांडणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या व्यतिरिक्त कोणीही केलेली नाही. जातिव्यवस्थेची विशेष वैशिष्ट्ये विचारात घेतली तर तिचा अर्थव्यवस्थेचा कसा संबंध आहे हे अधिक स्पष्ट होऊ शकेल. भारतात सरंजामशाहीतील जातिव्यवस्था, उत्पादन साधने व साधन संपत्तीची विभागणी जातीच्या आधारावर झालेली होती (कांबळे, ४). या संशोधनपत्रात, आंबेडकर यांचे अर्थशास्त्रीय विचार, त्यांचे लेखन, आणि त्यांच्या कार्यांचा अभ्यास केला जाईल.

## १. आंबेडकरांचे अर्थशास्त्रीय दृष्टिकोन

डॉ. आंबेडकरांची विविध रूपे सर्वपरिचित आहेत. ते केवळ संकल्पनात्मक नाही तर ते व्यवहारिक असल्याची अनुभूती त्यांच्या अध्ययनातून मिळते. "बहुजन हिताय, बहुजन सुखाय" या मंत्रातून त्यांचे आर्थिक विचार स्पष्ट दिसून येतात (बांबळे, ८८-९१).

डॉ. आंबेडकरांचे अर्थशास्त्रीय दृष्टिकोन हे व्यापकपणे समजून घेण्याचे साधन आहे. त्यांनी जातीय भेदभाव, आर्थिक असमानता, आणि सामाजिक न्याय यांवर गहन विचार केला. आंबेडकरांचे मते, आर्थिक विकासामध्ये सर्वांना समान संधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. त्यांनी भारतीय अर्थव्यस्थेतील असमानता कमी करण्यासाठी अनेक योजनांची शिफारस केली.

डॉ. आंबेडकरांचे अर्थशास्त्रीय विचार सामाजिक न्याय, आर्थिक समता आणि सर्वसमावेशक विकास यांच्यावर आधारित आहेत. त्यांनी भारतीय समाजाच्या आर्थिक संरचनेवर गंभीर विचार केला आणि आर्थिक असमानता दूर करण्यासाठी विविध उपाय सुचवले. 'डॉ. आंबेडकरांमध्ये भूतकालीन व वर्तमानकालीन समाजव्यवस्थेचा आणि राजकीय अर्थव्यवस्थेचा सर्वंकष अभ्यास करून संपूर्ण समाजाच्या हिताची व कल्याणाची आर्थिक विचारधारा व कार्यक्रम देण्याची क्षमता होती.' (कांबळे, १)

डॉ. आंबेडकरांनी आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत गरीब आणि वंचित वर्गांना समाविष्ट करणे आवश्यक असल्याचे सांगितले. त्यांच्या मते, आर्थिक धोरणे सर्वसमावेशक असायला हवीत, जेणेकरून विविध सामाजिक गटांना लाभ मिळवता येईल. त्यांनी ग्रामीण विकासावर विशेष लक्ष केंद्रित केले, कारण भारतातील बहुतेक लोकसंख्या ग्रामीण भागात राहते. आंबेडकरांनी यशस्वी आर्थिक धोरणांसाठी सहकारी अर्थशास्त्राच्या महत्वावर जोर दिला. त्यांचे विचार संपूर्ण भारतीय अर्थव्यवस्थेवर आणि आर्थिक विकासाच्या योजनांवर परिणामकारक ठरले.

डॉ. आंबेडकर यांचा अर्थशास्त्रीय दृष्टिकोन विशेषतः आर्थिक असमानतेवर आणि सामाजिक न्यायावर केंद्रित होता. त्यांच्या विचारांमुळे भारतीय समाजात भौतिक व सामाजिक स्थिरता साधण्याचा मार्ग तयार झाला. प्रांतिक सरकारांच्या जबाबदाऱ्या ध्यानात घेऊन करांच्या रूपाने जमा होणाऱ्या उत्पन्नाचे न्याय्य वाटप केंद्र व प्रांतांमध्ये व्हावे. केंद्राच्या जबाबदाऱ्या अधिक आहेत, हे प्रांतांनी ध्यानात ठेवावे; परंतु राज्यांना त्यांच्या जबाबदाऱ्या पूर्ण करण्यासाठी आवश्यक तो पैसा पुरवण्याची जबाबदारी केंद्राची आहे. ही तारेवरची कसरत आहे. डॉ. आंबेडकरांचे हे विचार ध्यानात घेतले की राज्यघटनेच्या बाराव्या विभागात २६४ ते ३०० या कलमान्वये 'वित्त आयोग' स्थापन करण्यामागील दृष्टी कळते. केंद्र-राज्ये यांच्यात वित्तीय निधीचे वाटप करण्याची व प्रत्येक पाच वर्षांनी त्याचा आढावा घेण्याची ही घटनात्मक तरतूद झाली. (मुणगेकर)

**२. जातीव्यवस्था औद्योगिक विकासालाही बाधक**

डॉ. आंबेडकर जातिव्यवस्थेमुळे औद्योगीक विकासाला बाधा झाल्याचे मांडतात. त्यामुळे सर्वत्र दारिद्र्य निर्माण झाले असे ते स्पष्ट करतात. खोती, महारवतन, बलुतेदारी पद्धती, अस्पृश्यता, सावकारी पाश व जातिव्यवस्थेमुळे गरीबी निर्माण झाली व औद्योगीक विकासही कुंठित झाला.

डॉ. आंबेडकर म्हणतात. 'उद्योग हा कधीही अचल नसतो. त्याच्यात झपाट्याने व आकल्पिक बदल होत असतात. व्यक्ती जर आपला पेशा बदलायला स्वतंत्र असली, तरच ती अशा बदलांशी जुळवून घेऊ शकते. परिस्थितीशी जुळवून घ्यायचे असे स्वातंत्र्य व्यक्तीला नसेल तर तिला आपली उपजीविका मिळवणे अशक्य होईल. जातिव्यवस्था ही हिंदूंना त्यांची ज्या उद्योगधंद्यांमध्ये गरज आहे त्यात जायला ते त्यांचे जन्मजात पेशे नसले तर मनाई करते. पेशांमध्ये फेरबदल करायला जात प्रतिबंध करीत असल्यामुळे आज देशात दिसत असलेल्या बऱ्याच बेकारीला ती प्रत्यक्ष कारणीभूत आहे." जातिव्यवस्थेमुळे जातीचे स्तरीकरण घडून येते. जे औद्योगीक विकासाला बाधा आणते. (कांबळे, ७)

**३. श्रमिकांचे हक्क**

डॉ. आंबेडकर यांच्या विचारांनुसार, श्रमिक हक्कांची यथायोग्य अंमलबजावणी केल्यास समाजात असमानता कमी होईल. त्यांनी श्रमिक संघटनांना मजबूत करण्यावर भर दिला, ज्यामुळे कामकाजाच्या वातावरणात सुधारणा झाली. त्यांच्या दृष्टीकोनाने, श्रमिकांचे हक्क संरक्षित केले पाहिजेत, जेणेकरून त्यांना आर्थिक स्थिरता मिळेल. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत श्रमिक वर्गाची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. त्यांनी श्रमिक वर्गाला स्वतःच्या हक्कांसाठी लढण्यास प्रोत्साहन दिले.

**४. आर्थिक समानता**

डॉ. आंबेडकरांच्या मते, समाजात सर्व वर्गांसाठी समान संधी उपलब्ध करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यांनी आर्थिक समता साधण्यासाठी उपाय सुचवले. 'सुसंकृत समाजाला श्रमविभागणीची निर्विवादपणे आवश्यकता असतेच. परंतु जगातील इतर कुठल्याही सुसंकृत समाजात श्रमविभागणी अत्यंत अनैसर्गिक व पाणीबंद कप्प्यात केलेल्या श्रमिकांच्या विभागणीशी सांगड घातली गेलेली नाही. जातिव्यवस्थाहि अशी एक श्रेणीबद्द व्यवस्थाआहे जिच्यात श्रमिकांची श्रेष्ठ कनिष्ठतेच्या तत्वावर विभागणी केलेली असते. दुसऱ्या कुठल्याही देशात श्रमविभागणीची सांगड श्रमिकांच्या उच्च व नीच श्रेणीशी घातलेली नाही. (कांबळे, ७)

**५. चलनव्यवस्थे विषयी विचार**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा "रुपयाचा प्रश्न त्याचे मुळ आणि समाधान" पदवीसाठी लिहलेल्या प्रबंधात चलनाविषयी माहिती मिळते. हा ग्रंथ १९२३ मध्ये प्रकाशित करण्यात आला. डॉ. बाबासाहेबांनी चलनपध्दतीचा, ग्रामीण अर्थव्यवस्था वस्तुची अदलाबदल करुन व्यवहार चालवण्यापासून ते सोने-चांदी या धातुंचे चलन आणि आजचे कागदी चलन

खात्यापर्यंत सांगोपांग व जिज्ञासू प्रवृत्तीने अभ्यास करुन त्यांचा शोध घेवून ग्रंथात अचूक व विस्तृत माहिती दिली. डॉ. बासाहेब सांगतात की, ब्रिटीश राजवटी पुर्वी मोगल साम्राज्याच्या आर्थिक व्यवस्थेचा पाया अकबराने घातला. त्या काळापासून भारतात प्रामुख्याने चलन म्हणुन सोने-चांदी किंवा इतर धातुंचा वापर होत असे. तसेच ब्रिटीशपुर्व राजवटीत नोकरांना आणि सैनिकांना वस्तु स्वरुपाने पगार मिळत असे. ब्रिटीशांनी त्या ऐवजी रोख पैसे देण्यात सुरुवात केली. डॉ. आंबेडकरांचे तर्कनिष्ठ आणि दृढ मत होते, की जोपर्यंत रुपयाच्या सामान्य कयशक्ती मध्ये स्थिरता येत नाही. तोपर्यंत हे चलन स्थिर होण शक्य नाही आणि प्रामुख्याने ही बाब विनिमय प्रमाणामुळेशक्य होत नव्हती. या व्यवस्थेमुळे रोगाच्या मुळ कारणाचा शोध घेण्याऐवजी फक्त लक्षणे विचारांत घेवून उपाय केला जात होता. डॉ. बाबासाहेबांनी हे सुचवलेले विचार सत्य आणि मुलगामी होते. (राऊत, ९८)

**६. अर्थशास्त्रीय लेखन**

डॉ. भीमराव आंबेडकर हे भारतीय समाजसुधारक, अर्थशास्त्रज्ञ आणि विधीशास्त्रज्ञ होते. त्यांच्या लेखनाचे आणि कार्याचे मुख्य स्रोत त्यांच्या विचारशक्तीचे ठळक दर्शन घडवतात. आंबेडकरांचे जीवन आणि विचार हे समाजातील विषमता आणि अन्यायाच्या विरोधात उभे राहण्याच्या प्रयत्नांचे प्रतीक होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अर्थशास्त्र या विषयावर अधिक स्वतंत्र ग्रंथ लिहिले नसले तरीही इतर ग्रंथामध्ये जे लेखन केले त्या सर्व ग्रंथांना अर्थशास्त्राचे परिमाण असल्याचे दिसून येते. त्यामध्ये जातिव्यवस्था, अस्पृश्यता यासारख्या सामाजिक समस्यांच्या आर्थिक परिणामांची त्यांनी केलेली मीमांसा यांचा उल्लेख करावाच लागतो. त्यांनी वेळोवेळी केलेली भाषणे, तसेच कारणपरत्वे ब्रिटीश सरकारला सदर केलेली निवेदने आणि दिलेल्या साक्षी या आर्थिक विचारांनी ओंतप्रोत भरलेल्या दिसून येतात.

डॉ. आंबेडकरांनी अर्थशास्त्रावर तीन ग्रंथ लिहिले :

1. ॲडमिनिस्ट्रेशन ॲन्ड फायनान्स ऑफ दि ईस्ट इंडिया कंपनी
2. इव्होल्युशन ऑफ प्रोव्हीन्शियल फायनान्स ॲन्ड सोल्युशन
3. दि प्रोब्लेम ऑफ रुपी : इट्स ओरिजिन ॲन्ड सोल्युशन

हे तीन ग्रंथ एम. ए., पीएच. डी. आणि 'डॉक्टर ऑफ सायन्स' या तीन पद्व्यांसाठी लिहिलेले प्रबंध आहेत. (जाधव, ३६२)

या अर्थशास्त्रीय लेखनामध्ये डॉ. आंबेडकरांची लेखनशैली उत्तरोत्तर समृद्ध होत गेली हे स्पष्टपणे जाणवते. त्यांचा वाढता आत्मविश्वास त्यांच्या लेखनातून चढत्या क्रमाने व्यक्त होतो. आपल्या पहिल्या ग्रंथामध्ये ब्रिटिश राज्यकर्त्यांकडून भारतीय जनतेवर होणारा अन्याय स्पष्ट करताना संयुक्तिक परंतु इतर तज्ञांचे दाखले देण्यावर त्यांचा भर आहे. मात्र तिसऱ्या 'दि प्रॉब्लेम ऑफ रुपी' ग्रंथामध्ये ते स्वत:च घणाघाती टीका करतात. उदाहरणार्थ, फाऊलर कमिटीच्या अहवालावर टीका करताना ते म्हणतात, "हा अहवाल इतरांच्या मते त्यांच्या विद्वत्तेमुळे नावाजलेला आहे. माझ्या मते तो त्याच्या मूर्खपणामुळे नावाजला जाऊ शकतो." त्यांचा वाढता आत्मविश्वास प्रतीत होतो, तो अशा विधानांमधून.

डॉ. आंबेडकरांच्या सर्व अर्थशास्त्रीय लेखनाला एक सुसंगत अशी तत्वज्ञानाची बैठक आहे. राज्यसंस्थेच्या वित्त विषयाचे पहिल्या दोन ग्रंथामध्ये विवेचन करताना, राज्य संस्थेच्या वित्ताचे सामान्य माणसाला फायदेशीर ठरू शकेल असे विकेंद्रीकरण करण्यावर त्यांचा भर आहे. त्याचप्रमाणे, 'प्रॉब्लेम ऑफ रुपी' मध्ये चलनव्यवस्थेची मिमांसा करताना भाववाढीने सामान्य माणूस होरपळून जाऊ नये, अशा प्रकारच्या चलनव्यवस्थेचा ते पुरस्कार करतात. याचाच अर्थ, 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' हा त्यांच्या सर्व आर्थिक लेखनाचा स्थायिभाव आहे. डॉ. आंबेडकरांचे अर्थशास्त्रीय लेखन हे सर्व देशाला समोर ठेवून करण्यात आलेले आहे. कोणत्याही वर्गापुरते ते सिमीत नाही. (जाधव, ३७५)

त्यांचे विचार आधुनिक भारताच्या सामाजिक-आर्थिक धारणांचे बोधक आहेत. त्यांनी दलितांच्या हक्कांसाठी संघर्ष केला आणि त्यांच्या आर्थिक व सामाजिक सुधारणा आंदोलनात महत्त्वाची भूमिका बजावली.

डॉ. आंबेडकरांचे लेखन, त्यांची ऐतिहासिक दृष्टिकोन, सामाजिक स्थितीचे विश्लेषण आणि सुधारणा यांचे उद्दीष्ट यामुळे आजही त्यांच्या विचारांचा प्रभाव जाणवतो. त्यांचा अभ्यास करणे म्हणजे एक व्यापक सामाजिक न्याय आणि समानतेच्या दिशेने वाटचाल करण्याची प्रेरणा घेणे होय. त्यांच्या विचारधारेतून प्रेरित अनेक सामाजिक चळवळी उभ्या राहिल्या आहेत, ज्या आजच्या काळातही प्रासंगिक आहेत.

त्यांच्या लेखनामध्ये शैक्षणिक, सामाजिक, आणि आर्थिक दृष्टिकोनांचा समावेश आहे, ज्यामुळे भारतीय समाजाच्या सुधारण्यास गती मिळाली. आंबेडकर यांचे विचार आजच्या काळात देखील ताजे आहेत, कारण त्यांनी समाजातील असमानता आणि भेदभाव यांचे थेट खंडन केले.

आजच्या काळात, डॉ. आंबेडकरांचे विचार अधिक महत्वाचे ठरले आहेत. आर्थिक असमानता, सामाजिक भेदभाव, आणि श्रमिक हक्क याबाबत त्यांच्या विचारांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. आजच्या समाजात, त्यांच्या विचारांचे अनुकरण करून, आपण अधिक समतोल समाजाची निर्मिती करू शकतो.

**निष्कर्ष:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय समाजाच्या आर्थिक आणि सामाजिक स्थैर्याबाबत महत्वपूर्ण विचार मांडले, जे आजही अत्यंत उपयुक्त ठरतात. त्यांनी समाजातील वंचित आणि शोषित वर्गाच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी लढा दिला. त्यांच्या मते, कोणत्याही देशाच्या प्रगतीसाठी सामाजिक आणि आर्थिक समानता अत्यावश्यक आहे. आर्थिक असमानतेला आळा घालण्यासाठी त्यांनी विविध मार्गदर्शक तत्वे मांडली, ज्यामध्ये मुख्यतः संपत्तीचे समतोल वितरण, औद्योगिकीकरण, शिक्षणाचे प्रसार, आणि श्रमिकांच्या हक्कांचे संरक्षण यांचा समावेश होता.

आंबेडकरांच्या मते, जमीन आणि संपत्तीचे केंद्रीकरण ही आर्थिक असमानतेची मूळ कारणे आहेत. त्यामुळे, त्यांनी शेतकऱ्यांसाठी जमीन सुधारणा कायदे आणि श्रमिकांच्या हक्कांसाठी कारखाना कायद्यांसारख्या उपाययोजनांची गरज अधोरेखित केली. यामुळे केवळ वंचित घटकांना सक्षमता मिळाली नाही, तर समाजातील विषमता कमी होण्यास देखील मदत झाली. याशिवाय, त्यांनी आर्थिक धोरणांमध्ये श्रमिकांच्या आणि शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणावर भर दिला.

आंबेडकरांनी औद्योगिकीकरणाला राष्ट्रीय प्रगतीसाठी एक महत्वपूर्ण साधन मानले. त्यांच्या मते, फक्त कृषी उत्पादनावर आधारित समाज आर्थिकदृष्ट्या स्थिर राहू शकत नाही. औद्योगिक विकासाने समाजात रोजगाराच्या संधी निर्माण होऊन आर्थिक स्थिरता येईल. त्यांनी केंद्र सरकारच्या नियोजन आयोगाच्या स्थापनामध्ये महत्वपूर्ण भूमिका बजावली, ज्याचा उद्देश आर्थिक विकासाचे दिर्घकालीन नियोजन करणे होते.

डॉ. आंबेडकरांच्या विचारांचे अनुकरण करून आजही आपण आर्थिक असमानता कमी करण्यासाठी प्रयत्न करू शकतो. त्यांचे विचार केवळ वंचित वर्गासाठीच नव्हे, तर संपूर्ण भारतीय समाजाच्या प्रगतीसाठी प्रेरणादायी आहेत. त्यांनी दाखवलेल्या मार्गावर चालल्यास आपल्याला एक अधिक समतोल आणि समावेशक समाजाची निर्मिती करता येईल.

**संदर्भ:**

Modern Language Association (MLA) Style

कांबळे, म. ना., *डॉ. आंबेडकरांचे आर्थिक विचार आणि जातीसमाज,* सावित्रीबाई फुले प्रकाशन, चिंचवडगाव, पुणे.

जाधव, नरेंद्र. *डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरवग्रंथ,* महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९९९.

बांबळे, मीना तुळशीराम. "डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार", *देश आणि विदेशातील विविध पुरुष कर्तृत्वाचे योगदान,* १२/०४/२०२३,

https://mpcollegepimpri.edu.in/zel_admin//uploads/research_pdf/20230412122135.pdf

मुणगेकर, भालचंद्र. "अर्थशास्त्रज्ञ आंबेडकर" महाराष्ट्र टाइम्स ६/१२/२०२२,

https://marathi.indiatimes.com/editorial/article/bhalchandra-mungekar-article-on-dr-babasaheb-ambedkar-as-an-economist/articleshow/82058435.cms

राऊत, संदीप म. "डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार." *तिफण,* वर्ष १२ अंक १, एप्रिल, मे, जून, २०२१, पान ९५-९९,